National Conference

on

# POLICIES AND PROSPECTS OF TEACHER EDUCATION - 2019

## NCPPTE - 2019

**5th and 6th January 2019**



**Organized by**

Post Graduate Department of Education and IQAC

Sant Gadge Baba Amravati University, Amravati

in Collaboration with

aharashtra State Secondary Teacher Educator's Association (MSSTEA

**Venue**

**A.V. Theater**

**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**

Scanned with CamScanner

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)

# राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिशदेने (एन.सी.टी.ई.ने) प्रसिद्ध केलेल्या अभ्यासकम चौकटीचा तुलनात्मक अभ्यास.

डॉ.कविता साळूंके
संचालक शिक्षणाशास्त्र विदयाशाखा ,
यंशवंतराव चव्हाण महाराष्ट मुक्त विदयापिठ, नाशिक.

## 1 प्रस्तावना–



भारताला 21 शतकात जगातील विकसित देशांच्या बरोबर उभे रहायचे असेल तर शिक्षणाच्या माध्यामाने या देशाच्या नागरिकांमध्ये समस्यांना तोंड देण्याचे समार्थ्य निर्माण केले पाहिजे आणि म्हणूनच नविन शैक्षणिक धोरणाला महत्व आहे.ज्याआधारे सक्षम,जबाबदार व देशाला उपयुक्त ठरणारे नागरिक घडविले जातील,परंतु त्यासाठी या देशात उच्च प्रकारचे सामान्य शिक्षण व तितकेच दर्जेदार व्यवसायिक शिक्षण प्राप्त केलेले अध्यापक हवेत."अध्यापन यशस्वीपणे घडवून आणण्याची जबाबदारी केवळ उत्तम शिक्षण घेतलेले स्त्री–पूरुष करु शकतात." डोंट(1961),'त्रीगुनासेन(1967) शिक्षणमंत्री म्हणतात, "सामान्यशिक्षणात आपल्या संस्थेत अत्यंत परिश्रम करण्याची जिद्द निर्माण करण्याची गरज आहे.तसेच त्यांच्यात अध्ययन आणि प्राविण्य या क्षमतांचा पाठपुरावा करण्याइतकी जाणीव निर्माण करण्याची गरज आहे,आणि त्यांच्याकडे (शिक्षकाकडे) सोपविलेला मुलांच्या अभिरुचीबद्दल आपलुकी आणि जिव्हाळा निर्माण व्हावा याची गरज आहे."

एकूणच आपल्याला उत्तम अध्यापकांची जाणकार शिक्षकांची सुसमायोजित,सुक्ष्म व आपल्या व्यावसायिकनिष्ठा बाळगणाऱ्या शिक्षकांची आज गरज आहे.त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणाच्या संदर्भात शिक्षण महाविद्यालयांची भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे.शिक्षण महाविद्यालयांच्या कार्याची मिमांसा करतांना "Agencies of Teachaer Education:Role Function"" हया लेखाच्या शेवटी प्रा.कुंड(1990) म्हणतात " It can be concluded that the main function of these colleges is to develop in their students critical receptivity to new ideas not merely to accept or reject them but to able to examine them from all angels and point of view"

## 2 शिक्षक प्रशिक्षणाचा इतिहास

भारतात पहिला शिक्षक प्रशिक्षण संस्था इ.स.1856 साली मद्रास येथ गव्हर्मेंट नॉर्मल स्कूल या नावाने स्थापन झाली.अशाच प्रकारची संस्था लाहोर येथे इ.स 1880 साली स्थापन झाली.इ.स. 1882 मध्ये शिक्षण आयोगाची स्थापना झाली.या आयोगाच्या शिफारशींनुसार अध्यापन तंत्रांची परीक्षा नोकरीत कायम करण्यासाठी आवश्यक बाब ठरविली गेली आणि 1899 मध्ये माध्यमिक शिक्षण प्रमाणप्रत्र परीक्षा (एस.टी.सी.) सुरु झाली. त्यानुतर मध्यवर्ती सरकारने राज्य सरकारांना अनुदान देण्यास सुरवात केली.इ.स 1906 मध्ये मुंबई माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय तर 1908David Hare Training College कलकत्ता येथे सुरु करण्यात



२।२ २।१

Scanned with CamScanner

आला.तर 1982 –83 पासून शासनाने शिक्षणाशास्त्र पदवी शिक्षणकमास परवानगी दिली.1963–64 पासुन भारतात प्रत्येक राज्यात राज्य शिक्षणाशास्त्र संस्था स्थापन झाल्या.सर्वप्रथम महाराष्ट्रात ती संस्था पुणे येथे स्थापन झाली. (S.C.E.R.T.)या संस्थेचे कार्य राष्ट्रीय पातळीवर (S.C.E.R.T.) च्या धर्तीवर करण्यात आले आहे. ही संस्था पुणे विद्यापीठाला 'पदव्युत्तर संशोधन संस्था'म्हणून शिक्षण विषयांसाठी सलग्न करण्यात आली आहे व तिच्या मार्फत एम.एड. आणि पीएच.डी या (शिक्षण) पदव्यांकरिता विद्यार्थी तयार करण्यात येतात.

### 3 शिक्षक प्रशिक्षणाचे महत्व गरजा

शिक्षक प्रशिक्षण प्रामुख्याने शिक्षकाची गुणवत्ता सुधारण्याचे कार्य करते. आपल्या घटनेने सर्वांना प्राथमिक शिक्षणाचा अधिकार दिला असल्याने मोठया प्रमाणात शिक्षकांची गरज असते.परिणामतःया व्यवसायात इतर व्यवसायांप्रमाणे फक्त बुद्धीमत्तेचेच विद्यार्थी येतात असे नव्हे तर सर्वसामान्य बुद्धीमते विद्यार्थीही येतात.त्यामुळे त्यांना अध्यापनाची कौशल्ये,अध्यापन प्रशिक्षण देणे अनिवार्य वाटू लागेल.मोठया प्रमाणातील शिक्षक प्रशिक्षणार्थींची संख्या व अल्प प्रमाणातील शिक्षक प्रशिक्षक संस्था या व्यस्त प्रकारामुळे वर्गातील शिक्षक प्रशिक्षणार्थींची संख्या वाढली त्यामुळे गुणात्मक वाढ कमी होऊ लागली.

अ) शिक्षण प्रशिक्षण संस्थामध्ये व्यापारीकरणाचे घटक आले.
ब ) सुटसुटीत व सोपे,पर्यायी पद्धतीवर भर दिला जाऊ लागला.उदा.सुटीतील पत्राव्दारे ,दुरशिक्षणाव्दारे बी.एड.
क) शिक्षक– प्रशिक्षण संस्थांची संख्या वाढली पण त्या संस्थामधील भौतिकसुविधांकडे लक्ष न दिल्याने गुणवत्ता कमी होऊ लागली.
ड)एकेकार्वात भरमसाठ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ लागला.
या सर्व चितांजनक परीस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी एन.सी.टी.ई.ची स्थापना झाली.

### 4. एन.सी.टी.ई.ची रचना व कार्य

1973 मध्ये देशातील अध्यापक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी भारत सराकरने एन.सी.टी.ई. ची स्थापन केली.ही राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद अध्यापक शिक्षणाचा दर्जा वाढविणे व शैक्षणिक समस्याविषयी केंद्र व राज्य शासनाला सल्ला देण्याचे कार्य करते.हया परिषदेने विद्यापीठ अनुदान आयोग मंडळ.आखिल भारतीय तंत्रिक शिक्षण परिषदराष्ट्रीय शिक्षण सल्लागार मंडळ,एन.सी.टी.ई.आणि योजना आयोग हयांच्या प्रतिनिधींचा समावेश असतो.याशिवाय शिक्षण क्षेत्रातील 12 तज्ज्ञ सभासदही नेमलेले आहे.एन.सी.टी.ई. ने सर्व पातळीवर अध्यापक शिक्षणाचा अभ्यासकम सुधारण्यासाठी एक आदर्श पाठयकमांची रूपरेषा प्रसिद्ध केली तसेच अध्यापक दर्जा टिकविण्यासाठी काही प्रमाणके घालून दिली.

### 5. एन.सी.टी.ई ची कार्य

अ) शिक्षक प्रशिक्षण संस्थांना मान्यता देणे किंवा काढून घेणे.
ब) शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासकम व पद्धती हयांच्या विकासासाठी मार्गदर्शक तत्वे घालून देणे.
ड) तसेच सेवांतर्गत शिक्षणाची निरनिराळया अभ्यासकमांचा कालावधी,कार्यकम आखणे, मूल्यमापन, प्रौढशिक्षण, अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या निदेशकांसाठी प्रशिक्षण कार्यकम आखणी इ.बाबत कार्य करणे.(एन.सी.टी.ई.ॲक्ट)

प्रशिक्षणासाठी संबंधित या संस्थेचे. कार्य अध्यापक शिक्षणाविषयी प्रश्न सोडविण्यास तितकेसे प्रगती दाखवीत नाही असे लक्षात आल्यावर 1986 च्या नव्या धोरणात भारत सरकारने एन.सी.टी.ई ला सर्व प्रकारे सहाय्य करण्याचे ठरविले.त्यासंदर्भात डॉ.कोहली (1992)च्या *Teacher Education In India* हयातीलखालील परिच्छेद लक्षात घेण्यासारखा आहे.

1986 च्या नव्या धोरणात असे म्हटले आहे की" The National Council of Teacher Education will be Provided the necessary resources and capability to accredit institution of Teacher Education and provide guidance regarding curricular and methods.



216 212

Scanned with CamScanner

## 6 एन.सी.टी.ने प्रकाशित केलेल्या शिक्षक प्रशिक्षणाच्या अटी

1973 ला एन.सी.टी.ई ची स्थापना झाल्यानंतर 1978 मध्ये शिक्षक प्रशिक्षणासाठी प्रथम चौकट बाहेर आली.त्यानंतर दहा वर्षांनी 1988 मध्ये व्दितीय,1998 मध्ये तृतीय आणि 2014 मध्ये चौथी चौकट बाहेर आली.

या चारही चौकटींचा अभ्यास करता असे आढळून येते की,1978 ची प्रथम तयार केलेली चौकट सर्वात सविस्तर चांगली आहे.पुरेशा मार्गदर्शक तत्वे त्यात दिलेली आहेत.त्यानंतर 1988 ची चौकट त्यामानाने कमी माहिती पुरविते आणि आता खरे तर सरकारची मान्यता मिळाल्यानंतर खूपच सविस्तर,अभ्यासक,सपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व असणारी असावी असे अपेक्षित असतांना 1998 व 2014 मध्ये हातात आलेली चौकट खूपच त्रोटक,धुसुस,अस्पष्ट व गोंधळ निर्माण करणारी आहे.हा अभ्यासक्रम तयार करतांना फक्त 200 तज्ज्ञच विचारात घेण्यात आलेले आहेत.व ते देखील सपूर्ण भारतातील नसून उत्तर भारतातील आढळून येतात.त्यामूळे या चौकटीन बाबत असामधान व्यक्त केले जात आहे.

## 7.संशोधन शिर्ष:

राष्ट्रीयशिक्षण प्रशिक्षण समितीने (एन.सी.टी.ई.)प्रसिद्ध केलेल्या अभ्यासक्रम चौकटीचा तूलनात्मक अभ्यास या अभ्यासासाठी दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आला.त्यासाठी आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व अभ्यासक्रम चौकटी विचारात घेण्यात आल्या.साधन म्हणून चेकलिस्ट तयार करण्यात आली.शेकडेवारीने विवेचन करण्यात आले.मिळाले निष्कर्ष पुढे मांडले आहेत.

अ) एन.सी.टी.ई.ने प्रकाशित केलेल्या आजवरच्या अभ्यासक्रमांचा तुलनात्मक तक्ता–

| 1974 पूर्वीचा | 1974–80 | 1980–89 | 90 नंतर | 1998 | 2014 |
|---|---|---|---|---|---|
| .पाच विषय 30/50 | पायाभूत अभ्यासक्रम सहा विषय 20/40 पाठ | 5 ते 6 विषय उयोन्मूख भारतीय समाजाचा समावेश सूक्ष्म अध्यापन 20% पाठ आशय समावेश 1978 | पच विषय उदयोन्मूख भारतीय समाजाचा समावेश सूक्ष्म अध्यापन 20% पाठ आ.अ.प कृतीसत्र 1988 | पायाभूत अभ्यासक्रम 9 विषय नेवन विषय म.शिक्षणातील प्रश्न. मार्गदर्शन आणि समंत्रण, अभ्यासक्रम विकसन, वर्ग व्यवस्थापन, वैकल्पिक2 विषय 40% वेटेज शालेय विषयांचे विश्लेषण 20% ठतर प्रात्यक्षिके 20% | पायाभूत विषय 9 न्वीन विषय एकात्मिक शिक्षण, जेंडर शाळा व समाज, मूल्यमापन हा स्वतंत्र विषय, पर्यावरण शिक्षण, सत्र निहाय कार्यवाही, आंतरवासिता गुणदान 35 प्रात्यक्षिक, व 65%थेअरी वेटेज |

वरील तक्त्यावरून असे दिसते कीं,एन.सी.ई.आर.टी.ने कोणत्याही क्षेत्रात विशेष संशोधने करून आजच्या शिक्षकाला आवश्यक व उपयुक्त ठरणाऱ्या घटकांच्या समावेश चौकटीत केला नाही.उदा.आज तंत्रज्ञान,संगणकीकरण,नेटवर्किंग इ.घटकांचा अनिवार्य विषयाचा समावेश होणे आवश्यक असूनही प्रत्यक्षात मात्र ते विषय नाहीत.1998 च्या चौकटीत अनेक नीवन विषयसाविष्ट केलेत पण त्या विषयांची गरज व महत्व याचा विचार महत्वाचा नाही असे वाटते.2014 च्या चौकटीत थेअरीवर भर दिलेला दिसतो.बी.एड.प्रोफेशनल असल्याने



215 213

Scanned with CamScanner

खरेतर प्रात्यक्षिक भागाला जास्त वेटेज असणे अपेक्षित होते.खूप साऱ्या नवीन कल्पनांचा समावेश करतांना वेळेचा विचार करून शिक्षणक्रम कालावधी एका वर्षाने वाढवला.

**ब) एन.सी.टी.ई कडून अपेक्षा**

i.शैक्षणिक सेवा

ii.प्रशासकीय अपेक्षा.या दोन्हीचा पूर्तता तूलनेने कमी आढळते.

क) शैक्षणिक सेवे संदर्भात मते–

- प्रत्येक राज्यात शिक्षण प्रशिणासंदर्भात कार्यान्वित करण्यात येणाऱ्या गोष्टींचा शोध घेवून एन.सी.टी.ई.मार्फत त्यांचा प्रचार व प्रसार उदा.गारगोटी जि.कोल्हापूर येथे 4 वर्षांचा एकात्मिक बी.एड.शिक्षणक्रम फार वर्षांपासून चालू होता पण त्याचा पूर्वीही कोणी उल्लेख केला नाही व आताही केला नाही.
- काही प्रकल्प हाती घेणे.
- प्रत्येक राज्यातील शिक्षण मंडळाशी संपर्क ठेवून केलेल्या बदलाची दखल घेवून त्याप्रमाणे शिक्षण प्रशिक्षणात बदल करणे.

**ड) प्रशासकीय अपेक्षा चिकित्सा–**

आज.एन.सी.टी.ई.ची मान्यता सर्व महाविद्यालयांना अनिवार्य करण्यात आलेली आहे.त्याप्रमाणे सर्व महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयाच्या भोपाल विभागीय केंद्राकडे अर्ज केलेले आहेत.आज एन.सी.टी.ई च्या समित्या विविध महाविद्यालयांना भेट देऊन त्या महाविद्यालयाच्या मान्य/अमान्यतेबाबत निर्णय घेत आहेत पण येथे काही त्रुटी जाणवतात.

- भाषिक प्रतिनिधीचा अभाव.
- Communication चा अभाव
- खरोखरच अपेक्षेप्रमाणे भेट होते का
- भेटी देणाऱ्या तज्ज्ञांचे उदभोदान न केल्याने त्यांच्यातील एकवाक्यतेचा अभाव.
- कितीभेटी दिल्या ? त्यापैकी किती महाविद्यालयांना मान्यता दिली कितींना नाही याची माहिती अद्ययावततेचा अभाव.
- महाविद्यालयांना त्या विद्यापीठांच्या समिती भेट देतात त्या समितीची व एन.सी.टी.ई.ची समिती भेट यात काही फरक आहे का असल्यास कोणता
- वेगवेगळया राज्यातील शिक्षणासंदर्भातील नियमांच्या विचारांचा अभाव.
- पारंपारिक व दुरशिक्षण यांच्यासाठी नियाम करतांना त्यांचे वेगळेपणा विचारात घेतले नाही.
- याच बरोबर शिक्षण क्षेत्रातील,त्याचप्रमाणे शिक्षणातील बदलही एन.सी.टी.ई. ने विचारात घेतले पाहिजे पण त्याचाही अभाव दिसतो.

उदा.

i. अध्यापनापूर्वी शिक्षकांची अंतदृष्टी व जाणीव यांचा विकास करणे.

ii. नवीन शिक्षकाला आवश्यक असलेली कौशल्य व अभिवृद्धी यांचा विकास.

iii. नवनवीन ज्ञानाप्रमाणे अध्यापक पद्धतींचा समावेश.

iv. पेशाविषयीचा जिव्हाळा.

v. वैयक्तिक व सामाजिक गरजा यांना उलथून अभ्यासकम आखण्याची क्षमता विकसित करणे.

vi. वैज्ञानिक दृष्टीचा विकास.

vii.जीवनमूल्यांचा विकास करण्याची जाणीव इ.गोष्टींचा या शिक्षणकमाच्या चौकटीत कोठेतरी विचार करावयास हवा.



216 219

Scanned with CamScanner

बी.एड.प्रशिक्षण हे फलदायी होण्यासाठी त्याची उपयुक्तता वाढविण्यासाठी ते अधिकाधिक कृतियुक्त व्हावयास हवे.पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिकावर भर द्यावयास हवा.त्याची उपयुक्तता वाढायला हवी.पण प्रत्यक्षात मात्र याही चौकटीत 40 वेटेज सैद्धांतिक भागाला 60 च वेटेज प्रात्यक्षिकंना हवे.प्रत्यक्षात वे वेटेज 20 व 80 करणे अपेक्षित होत

## 8.समारोप

वरील सर्व मुद्दयांचा संकलितपणे विचार केला तर एन.सी.टी.ई.च्या मदतीने अध्यापन शिक्षणाचे हे नवे पर्व. यातील उणीवा दूर केल्यास आमच्या प्रशिक्षण महाविद्यालयातून बाहेर पडणारे शिक्षक हे दर्जेदार,कुशल,सक्षम,प्रविण तयार होतील व नवीन युवा पिढी चांगले शिक्षण प्राप्त होवू शकेल.या देशाचे भाविष्य उज्वल होण्यास सहाय्य ठरेल.एन.सी.टी.ई.च्या माध्यमातून अध्यापक शिक्षणातील कांती प्रशिक्षणाच्या बरोबर शैक्षणिक दृश्टीकडे नव्या जोमाने पुढे जाईल.अशी अपेक्षा व्यक्त करण्यास हरकत नाही.एन.सी.टी.ई.कडे अर्थात आपण सर्व संस्थांना एक नियंत्रण करणारी शासन व्यवस्था असे न पाहता,एकवाक्यता व शिक्षक प्रशिक्षणात प्रगती घडवून आणणारी संस्था म्हणून होकारात्मक दृष्टीने पाहणेही तेवढेच महत्वाचे वाटते.

## 9 संदर्भ

1. H.C. Dent. 1961. Teacher as a carrier. London. Bataford. P.73.
2. Triguna Sen. 1997. Minister of Education. Govt. of India in his address to the conference of Vince Chancellors. New Delhi, UGC, P.7.
3. Kundu C.L. 1990. Agencies of Teacher of Education. Role and functions in book New Delhi. Singh L.C. NCPERT.P.174.
4. Konali V.K. 1982. Teaching Education in India. Sponsored by UGC, New Delhi
5. Ministry of Human Resources Development, Govt. of India, National Policy on Education, New Delhi .1986
6. NCTE, Teacher Education Curriculum. A Frmework. New Delhi, (1978, 1988, 2014.)



217 215

Scanned with CamScanner